P.V.G.'s

# Muktangan English School & Jr. College,

44, Vidyanagari, Parvati, Pune - 411009.

## Terminal Examination (2025-26)

## Standard - XII

Subject : Marathi Marks : 50

Date : 07 | 10 | 2025 Time : 8.30 am to 11.00 am

**कृती १ पठित पाठाच्या आधारे कृती करा.** (८)

लेह, नुब्राव्हॅली, पँगाँग लेक आणि शेवटी द्रास, कारगिल अशा अव्याहत प्रवासात सतत भेटणारे, भरभरून बोलणारे जवान. त्यांची लष्करी अदब, प्रांत, धर्म, जात, भाषा अशा कुठल्याही प्रतिबंधाचा स्पर्शही नसलेले, केवळ भारतीयत्वाचा सुगंध ल्यालेले, सरहद्दीवर ठाम उभे राहिलेले आपले जवान! त्यांच्या शौर्याची, धाडसाची, खडतर साहसाची सतत आठवण राहावी, म्हणून सुरू केलेल्या मिशन लडाखचं हे शेवटचं पाचवं वर्ष! भाग्यश्रीच्या आणि बरोबर आलेल्या प्रत्येकाच्या मनात ही संवेदना निर्माण झाली, हे त्याचंच फलित. याचसाठी केला होता अट्टहास!'

गेल्या पाच वर्षात एक मात्र निश्चित जाणवलं, की तिथे गेल्यावर आपला अहंकार, बडेजाव आणि प्रतिष्ठितपणाची चढलेली पुटं निखळून पडताहेत. लडाखच्या भिन्न भिन्न दऱ्याखोऱ्यात भन्नाट एकाकी, रौद्र आणि हिरवळीचा दुरान्वयानेही संबंध नसलेल्या कठीण भूप्रदेशात राहूनही ममत्व, बंधुभाव जपणाऱ्या, नाती जोडणाऱ्या आणि ती टिकवणाऱ्या सैनिकांना भेटलं, की आपली माणसं' भेटल्याचा गहिवर दाटून येत आहे. आपले सैनिक हे हिरे आहेत. त्यांना आपण जपलं पाहिजे. त्यांच्याबद्दल कृतज्ञ राहिलं पाहिजे.

आम्ही पाच वर्षं रक्षाबंधनासाठी लडाखला ग्रुप घेऊन येत आहोत, याचं प्रचंड अप्रूप वाटून ब्रिगेडियर कुशल ठाकूर या सोहळ्यासाठी आणि आम्हांला भेटायला आवर्जून आले होते. १९९९ मधील कारगिल युद्धाच्या वेळी कर्नल असलेले कुशल ठाकूर तोलोलिंग फत्ते करण्याच्या योजनेचे शिल्पकार होते. ते आमच्यासारख्या सामान्य माणसांना भेटायला येतात, याच्यापरता मोठा सन्मान तो कोणता?

१) वरील उताऱ्यात आलेली कारगीलमधील वैशिष्ट्यपूर्ण गावे लिहा. (१)

२) लेखिकेने केलेले जवानांचे वर्णन तुमच्या शब्दात लिहा. (२)

३) भाग्यश्री व लेखिका यांच्या मनात निर्माण झालेल्या संवेदनांचे वर्णन करा.. (२)

४) तोलोलिंग फत्ते करण्याच्या योजनेचे शिल्पकार कोण होते ते लिहा. (१)

५) 'आपले सैनिक हे हिरे आहेत' हे वरील उताऱ्याच्या आधारे स्पष्ट करा. (२)

**कृती २ खालील काव्यपंक्तीवर आधारित कृती करा.** **(८)**

सरी-वाफ्यात, कांदं लावते
बाई लावते
नाही कांदं ग, जीव लावते
बाई लावते
काळ्या आईला, हिरवं गोंदते
बाई गोंदते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदत

ऊस लावते, बेणं दाबते
बाई दाबते
नाही बेणं ग, मन दाबते
बाई दाबते
कांड्या-कांड्यांनी, संसार सांधते
बाई सांधते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

फुलं सोन्याची, झेंडू तोडते
बाई तोडते
नाही फुलं ग, देह तोडते
बाई तोडते
घरादाराला, तोरण बांधते
बाई बांधते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

उन्हातान्हात, रोज मरते
बाई मरते
हिरवी होऊन, मागं उरते
बाई उरते
खोल विहिरीचं, पाणी शेंदते
बाई शेंदते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते
सिझर कर म्हतेय माती

१) खालील काव्यपंक्तींचा अर्थ स्पष्ट करा. (२)

सरी वाफ्यात, कांदं लावते
बाई लावते
नाही कांदं ग, जीव लावते
बाई लावते

२) रसग्रहण करा. (२)

उन्हातान्हात, रोज मरते
बाई मरते
हिरवी होऊन, मागं उरते
बाई उरते

३) आशयसौंदर्य स्पष्ट करा. (२)

फुल सोन्याची झेंडू तोडते

बाई तोडते

नाही फुलं ग, देह तोडते

बाई तोडते

४) वरील कविता कोणत्या काव्यसंग्रहातून घेतली आहे ते लिहा. ($\frac{१}{२}$)

५) वरील कवितेत कष्टकरी स्त्री करत असलेली कामे लिहा. (१ $\frac{१}{२}$)

**किंवा**

६) 'विंचू चावला' या भारूडाचे आशयसौंदर्य स्पष्ट करा. (२)

**कृती ३ अ) पठित साहित्य कृतीवर आधारित कृती करा (८)**

**कथेचे घटक**

(१) कथाबीज : कथाकार त्याच्या प्रतिभाशक्तीने एखाद्या घटनेत वास्तवाचे व कल्पनेचे रंग भरतो. हे करताना तो निसर्ग, समाज, सांस्कृतिक संदर्भ, वातावरण इत्यादी घटकांचे साहाय्य घेतो. या सर्व घटकांच्या मदतीने घटनामालिकेचे कथात्म साहित्यात रूपांतर होते; म्हणून कथेत घटना' हा महत्त्वाचा भाग ठरतो. कथेत या मूळ घटनेलाच कथाबीज' असे म्हणतात.

(२) कथानक : कथानकात घटना, प्रसंग, पात्रांच्या कृती, स्वभाववैशिष्ट्ये, वातावरण इत्यादींचे तपशील हळुवारपणे उलगडत जातात. कथेत कथानकातील घटकांचे एकत्रीकरण केले जाते. या एकत्रीकरणातून कथेची मांडणी आकाराला येते. हे कथानक उलगडताना त्यातील प्रवाहीपणही जपले जाते. कथाकाराच्या मनात कथेच्या अनुषंगाने निर्माण झालेला भावाशय वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कथन करणे हे कथानकाचे प्रयोजन असते.

(३) पात्रचित्रण : पात्रचित्रण हा कथेचा महत्त्वपूर्ण घटक आहे. पात्रचित्रणातून कथेचा आशय पुढे पुढे जात राहतो. कथाकार एखाद्या पात्राची वृत्ती, कृती, उक्ती, भावना, विचार, कल्पना, संवेदना, जीवनदृष्टी, जीवनपद्धती इत्यादींच्या चित्रणातून त्या व्यक्तीची शब्दरूप प्रतिमा तयार करत असतो. या शब्दरूप प्रतिमेला पात्र' असे म्हणतात. कथेतील पात्रांना वास्तवातील माणसांप्रमाणे रेखाटले जाते, म्हणून वाचकांची त्या पात्रांशी जवळीक साधली जाते. ही पात्रे कथाकाराची स्व' निर्मिती असते.

(४) वातावरण निर्मिती : कथेला स्थळ-काळाबरोबरच सामाजिक, भौगोलिक, सांस्कृतिक, राजकीय इत्यादींनी युक्त वातावरण असते. या वातावरणाचा वाचकांवर परिणाम होऊन तो कथानकाशी एकरूप होतो. वातावरणाचा पट जितका सघन तितकी कथा सकस होते.

(५) नाट्यमयता/संघर्ष : कथेत चांगल्या-वाईटाचा संघर्ष असतो. त्यातूनच नाट्यमयता निर्माण

होते. या संघर्षातूनच कथा उत्कर्षबिंदूपर्यंत पोहोचते. कथेत प्रत्येक वेळी संघर्षकिंवा नाट्य हे वाईट घटनांचेच असते असे नाही, तर आनंद आणि सुखात्मिक घटनांतूनही नाट्यमयता निर्माण होते. कथेच्या शेवटी कथेतील अनुभवांचा, घटनांचा उत्कर्षबिंदू नाट्यपूर्णरीतीने साधता येतो; पण तरीही कथानकाच्या ओघात स्वाभाविकपणे झालेला शेवट वाचकाला आकर्षित करतो.

१) कथेतील पात्रचित्रणेविषयी थोडक्यात माहिती लिहा. (२)

२) नाट्यमयता व संघर्ष याबद्दल थोडक्यात माहिती लिहा. (२)

**ब) पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतीही २)** **(४)**

१) घर सोडण्यामागचा अनुचा विचार तुमच्या शब्दांत लिहा

२) भिडे दाम्पत्याची सामाजिक बांधीलकी तुमच्या शब्दांत लिहा.

३) अनुला समाज कसा समजून घ्यायचा आहे ते लिहा.

**कृती ४ उपयोजित लेखनावर आधारित कृती करा. (कोणतेही ४)** **(८)**

१) मुलाखतीचे स्वरूप व हेतू स्पष्ट करा.

२) माहिती पत्रकाची गरज असणारी क्षेत्रे लिहा.

३) अहवालाचे स्वरूप स्पष्ट करा.

४) वास्तवदर्शी अहवाल लेखन हा अहवाल लेखनाचा आत्मा आत्मा आहे, हे विधान स्पष्ट करा.

५) व्यक्तिमधील 'माणूस' समजून घेण्यासाठी मुलाखत असते, हे स्पष्ट करा.

**कृती ५ अ) खालील पैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २०० ते २५० शब्दांत निबंध लिहा** **(१०)**

१) शब्द नसते तर ....

२) मी रस्ता बोलत आहे

३) मी अनुभवलेला पाऊस

४) गणेशोत्सव

५) AI आणि आजची पिढी

**ब) सूचनेप्रमाणे कृती करा.** **(८)**

१) क्रियापदाच्या रूपवरून वाक्याचा प्रकार ओळखा. (१)

i) अमोल शाळेत गेला

ii) उद्या जर पाऊस पडला तर मी शाळेत जाणार नाही.

२) वाक्याच्या आशयावरून वाक्याचा प्रकार ओळखा. (१)

i) तू उद्या केव्हा येणार आहेस?

ii) विटीदांडू हा खेळ आजकाल खेळला जात नाही.

३) वाक्य रूपांतर करा. (१)

i) ही इमारत खूप उंच आहे. (उद्गारार्थी वाक्य करा.)

ii) ही काही वाईट कल्पना नाही (वाक्य होकारार्थी करा.)

४) समास ओळखा. (२)

i) त्रिभुवन –

ii) भाजीपाला –

iii) पुरणपोळी –

iv) रामलक्ष्मण –

५) पुढील वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा. (१)

i) आम्ही गावी जातो.

ii) अमितने चित्र काढले.

६) खालील ओळीतील अलंकार ओळखून लिहा. (२)

१) ह्या फुलासारखे नाजूक फूल हेच.

२) न हे वदन, चंद्रमा शरदीचा गमे केवळ

३) मुंगी उडाली आकाशी तीने गिळीले सूर्यासी

४) होई जरी संतत दुष्टसंग,

न पावती सज्जन सत्त्वभंग

❖❖❖